# प्रकरण सहावे

## शैक्षणिक कार्यक्रमाचे मूल्यमापन

६.१ मूल्यमापन का आवश्यक आहे ?

६.२ मूल्यमापन विश्लेषण

६.२.१ महिला सहकारी शिबिर

६.२.२ युवक सहकारी शिबिर

६.२.३ सेवा सहकारी संस्था कार्यकर्ता शिबिर

६.२.४ दूध सहकारी संस्था कार्यकर्ता शिबिर

६.३ उपसंहार

६.४ निष्कर्ष

## ६.१ मूल्यमापन का आवश्यक आहे ?

सांगली जिल्हा सहकार बोर्ड लि. या संस्थेने राबविलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांची माहिती आपण मागील प्रकरणात पाहिली आहे.

बोर्डाने १९८५-८६ या वर्षापासून शैक्षणिक कार्यक्रमात ग्रामीण भागाच्या व सहकारी संस्थांच्या गरजेनुसार आपल्या शैक्षणिक कार्यक्रमात बदल केला आहे. कार्यक्रमांची व्याप्ती वाढवली आहे. अर्थात ८६ पूर्वीही बोर्डाने चांगल्या त-हेने शैक्षणिक कार्यक्रम राबवलेले दिसून येतो. राज्य सहकारी संघाच्या आर्थिक मदतीने सांगली सहकारी बोर्डाने, सहकारी शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंन्त पोचवण्याचे सर्वंकष प्रयत्न केले आहेत.

प्रत्यक्ष जे शिक्षण प्रशिक्षण घेणारे लाभार्थी आहेत त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार मूल्यमापनावरून बोर्डाच्या शैक्षणिक उपक्रमांचा त्यांच्यावर काय परिणाम झाला आहे किंवा नाही त्याबद्दलची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे.

बोर्डाने राबवलेल्या शैक्षणिक कार्यक्रमाचा लाभार्थी घटकावर काय परिणाम झाला हे अजमावण्यासाठी मूल्यमापन आवश्यक आहे. अभ्यासक्रमाची व्याप्ती, त्यातील त्रुटी, आपल्या मर्यादा, या सर्व बाबी मूल्यमापनामुळे लक्षात येतात. त्यानुसार सुधारणा करणे आवश्यक ठरते म्हणून मूल्यमापन हवे असते.

यादृष्टीने प्रत्येक शैक्षणिक कार्यक्रमाची सांगता करीत असताना सहकार प्रशिक्षण निदेशक, त्यांच्या विशिष्ट नमुन्यामध्ये मूल्यमापन नमुना देऊन सहभागी घटकाकडून भरून घेतलेल्या असतात. अनेक कार्यक्रमांच्या भरून घेतलेल्या मूल्यमापन नमुन्यांपैकी चार प्रकारच्या शिबिरातील सहभागी

व्यक्तीनी भरून दिलेल्या नमुन्याचे विश्लेषण खालील प्रमाणे आहे. प्रस्तुत नमुन्यामध्ये सहभागी शिबिरार्थीचे कोठेच नावाचा उल्लेख नसल्यामुळे शिबिरार्थींना आपली मते निर्भिडपणे मांडण्यास पूर्ण वाव आहे.

६.२.१ <u>महिला शिबिर</u> -

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाच्यावतीने दि. २६ डिसेंबर ते २८ डिसेंबर, १९९० या काळात घेतलेल्या महिला शिबिर, चिखली (यशवंतनगर) येथील शिबिराचे हे मूल्यमापन केले आहे.

मूल्यमापन नमुन्यामध्ये महत्वाचे एकंदर १० प्रश्न विचारले आहेत. त्यापैकी पहिला प्रश्न हा वर्ग आपणास तात्त्विक व व्यावहारिक दृष्टीने योग्य व उपयुक्त वाटला का ? असा आहे. याचे उत्तर सर्वच्या सर्व (३८) शिबिरार्थींनी होकारार्थी दिले आहे. (सारणी क्र. ६.१ पहा)

दुसरा प्रश्न - उपयुक्त का वाटली त्याची कारणे विचारली होती. याचे उत्तर मात्र वेगवेगळी मिळाली. तथापि स्त्रियांना बँकांच्या व्यवहारासंबंधी उपयुक्त माहिती मिळाली, माता बालसंगोपनाविषयी माहिती मिळाली तसेच ग्रामीण रोजगार, लघुउद्योग, कुटुंबकल्याण या विषयीही माहिती मिळाली असे मत बऱ्याच शिबिरार्थी महिलांनी नोंदवले आहे. बँकांच्या व्यवहाराविषयी माहिती मिळाली असे म्हणणाऱ्यांची संख्या १६ आहे. ३८ पैकी १० महिलांनी या बाबतीतील आपले मत नोंदवलेले नाही.

तिसरा प्रश्न - सदर वर्ग आपली व्यावहारिक गरज भागवतो का ? असा होता. त्याचे उत्तर १९ महिलांनी होकारार्थी दिले आहे तर १९ महिलांनी नकारार्थी दिले आहे. नकारार्थी उत्तराची कारणे अशी आहेत :

१) आदिवासी स्त्रियांच्या समस्या जाणून घेऊन त्यासंबंधी व्याख्याने ठेवली पाहिजेत.

२) बाल शिक्षण व स्त्री शिक्षण यावर भर दिला पाहिजे.

३) स्वावलंबनाची व्याख्याने देत असतानाच प्रात्यक्षिकावर भर दिला पाहिजे.

४) आरोग्य व आवर्ती ठेवीबद्दलही स्त्रियांना आणखी माहिती हवी होती.

५) कुटुंब नियोजन व गुप्तरोग यासंबंधीची माहिती मिळावी असे मत १० स्त्रियांनी व्यक्त केले आहे.

पाचवा प्रश्न होता - महिलांना शिबिराची वेळ सोयीची होती का ? कामाचे तास याबद्दल विचारणा केली असता २७ महिलांनी आहे तीच वेळ योग्य आहे असे मत नोंदवले तर ११ महिलांनी कामाची वेळ १ ते ४ असावी व शिबिराचे दिवस वाढवावेत अशा सूचना केल्या आहेत.

वर्गातील पाहुण्यांची व्याख्याने उपयुक्त वाटली का ? या प्रश्नाचे २६ महिलांनी होकारार्थी उत्तर दिले तर उर्वरित महिलांनी या व्याख्यानात आणखी माहिती द्यावी अशी सूचना केली आहे.

आणखी कोणत्या व्याख्यानांचा समावेश असावा असे विचारले असता सात महिलांनी खादी ग्रामोद्योगासंबंधी व्याख्याने ठेवावीत, वृक्षारोपण, बालसंगोपन, आरोग्य केंद्र, बँका, लघुउद्योग, अल्पबचत, गोबर गॅस, कायदा, हुंडाबळी या विषयावर व्याख्याने व्हावीत असे मत २५ महिलांनी व्यक्त केले आहे तर १३ महिलांनी आणखी व्याख्याने नकोत, आहेत ती पुरेशी आहेत असे सुचवले आहे.

गटचर्चा, वादविवाद यासारख्या नवीन शिक्षण पद्धतींचा वापर आपल्या दृष्टीने उपयुक्त वाटतो का ? याचे उत्तर ३६ शिबिरार्थी महिलांनी होकारार्थी उत्तर दिले आहे. आदिवासी भागात शिबिर घ्यावे असे म्हणणाऱ्यांची संख्या फक्त २ आहे.

असे वर्ग वेळोवेळी घेतल्यास फायदाचे ठरतील का ? वेळ, मुदत, प्रवेशाच्या अटी व ठिकाण कोणत्या असाव्यात असे विचारले असता काहीच बदल नको असे ३३ शिबिरार्थी स्त्रियांनी मत व्यक्त केले तर ५ जणींनी काहीच मत व्यक्त केले नाही.

शेवटी अशा शिबिरातून आपण काय शिकलात ? असा प्रश्न केला असता त्याबद्दल १० स्त्रियांनी स्वावलंबन, माता बालसंगोपन, पनरंचित सहकारी तत्वे, पोषक आहार, कुटुंबकल्याण इ. संबंधी चांगली माहिती मिळाली असे सुचविले, तर मुदतीचे कर्ज, शासनाच्या निरनिराळ्या कर्ज योजना, चेअरमन, सेक्रेटरी यांच्या कर्तव्याची जाणीव झाली असेही मत २४ जणींनी व्यक्त केले आहे. वनशेती व सेवा सहकारी संस्था कार्यक्रम होण्यासंबंधी माहिती मिळाली असे मत ४ जणींनी व्यक्त केले आहे.

वरील मूल्यमापनावरून असे दिसून येते की, ग्रामीण भागात महिला अशा शिबिरांना उपस्थित राहाण्यास उत्सुक आहेत. शिबिरांना महिलांमध्ये प्रतिसादही चांगला मिळतो. जागरूकता व नाविन्याचा स्वीकार करण्याच्या प्रवृत्तीत वाढ झाली आहे असेही दिसून येते.

सांगली जिल्हा सहकार बोर्डाने महिला शिबिरे आयोजित करून महिलांच्या आर्थिक, सामाजिक, प्रगतीस वाव दिला आहे.

स्त्री ही स्वभावत:च सोशिक असते. पूर्वापार चालत आलेल्या रूढीनुसार आपल्यावर अन्याय होतो आहे याची जाणीव तिला होत नाही. हे असच चालायच बाई ग हा स्त्री जन्म आहे, सोसलं पाहिजे, मुलीची जात आहे, खाली मान घालूनच जगल पाहिजे, या रूढींना धक्का देण्याचे काम स्त्री शिक्षणाने केले. सहकारातून स्त्रियांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी होण्याचा मार्ग या शिबिरातून दिसला असेही मत येथे स्त्रियांनी व्यक्त केले आहे.

स्त्रियांचे आरोग्य, गुप्तरोग, हुंडा यासारख्या जिव्हाळ्याच्या विषयावर शिबिरे घेतली गेल्यामुळे आपली मते येथे मोकळेपणानी स्त्रियांनी व्यक्त केली आहेत.

आपल्या पुढे येणाऱ्या समस्येची जाणीव होणे ही संशोधनाची पहिली पायरी आहे.

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाने महिला शिबिरे घेऊन महिलांच्या उत्कर्षासाठी एक नवी दिशा दर्शविली आहे. यासाठी स्त्री सहकार प्रशिक्षण निदेशिका असल्या पाहिजेत.

६.२.२ <u>युवक शिबिर</u> -

दिनांक २९ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, १९९१ या कालावधीत बोर्डाने घेतलेल्या युवक शिबिराच्या शिबिरार्थींकडून भरून घेतलेल्या मूल्यमापन नमुन्यावरून खालील माहिती उपलब्ध होते.

युवकांमध्ये सहकारी तत्वप्रणाली रुजावी, वाढावी व तिचा स्वयंरोजगारासाठी वापर करावा या हेतूने अशी शिबिरे घेतली जातात.

हा वर्ग आपणास तात्विक व व्यावहारिकदृष्टया उपयुक्त व फायद्याचा वाटला का ? याचे उत्तर सर्व ४१ शिबिरार्थींनी होकारार्थी दिले आहे.

उपयुक्त का वाटला ? त्याची कारणे १० विद्यार्थ्यांनी असे दिली आहेत की, दिशाहीन तरूणांना या शिबिरामुळे योग्य मार्गदर्शन मिळाले. इतर १० तरूणांनी असे लिहिले आहे की -

१) सहकारी तत्वप्रणाली राबवल्यामुळे होणारे फायदे-तोटे कळाले,

२) गावाचा विकास कसा करता येईल याचे मार्गदर्शन झाले.

३) सहकारी संस्थेच्या दैनंदिन कामकाजाबद्दल माहिती मिळाली.

४) सहकारी बँक व्यवसायासंबंधी माहिती मिळाली.

५) पुस्तकी ज्ञान व व्यवहार ज्ञान यातील तफावत या शिबिरा-मुळे कळाली.

६) सहकारा विषयीच्या शंका दूर झाल्या.

एकंदरीत अशी शिबिरे महाविद्यालयात घेणे उपयुक्त आहे असे सर्वच युवकांचे मत होते.

हा अभ्यास वर्ग आपली व्यावहारिक गरज पूर्ण करतो का ? याचे उत्तर १४ विद्यार्थ्यांनी होकारार्थी दिले आहे तर २७ विद्यार्थ्यांनी नकारार्थी उत्तर दिले आहे. कारण अशी शिबिरे सातत्याने भरविली पाहिजेत. म्हणून -

१) असे शिबिर वर्षातून दोनदा घ्यावे.

२) सहकारी साखर कारखाने, सूत गिरणी इ. बद्दल प्रात्यक्षिका-द्वारे माहिती द्यावी.

३) व्याख्याने देण्यास आलेल्या व्यक्तींनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी आणखी माहिती द्यावयास हवी होती. चर्चेला भरपूर वेळ द्यावा इत्यादी.

वर्गाची वेळ व कामाचे तास यासंबंधी २६ विद्यार्थ्यांनी आहे ही वेळ योग्य असल्याचे म्हटले आहे. तर १५ विद्यार्थ्यांनी नकारार्थी उत्तर दिले आहे.

वर्गातील पाहुणे व्याख्याने आपणास य उपयुक्त ठरली का ? याचे उत्तर सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांनी होकारार्थी दिले आहे.

कोणत्या विषयावर व्याख्याने हवीत याचे उत्तर १० विद्यार्थ्यांनी रोजगारासंबंधी मार्गदर्शन हवे असे सुचवले आहे. कॉलेज जीवनात सहकारी तत्वाचा वापर कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन झाले असे मत ७ विद्यार्थ्यांनी

व्यक्त केले. तसेच व्याख्याने तशी पुरेशी आहेत असेही मत १८ विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

गटचर्चा, वादविवाद यासारख्या शिक्षण पध्दतींचा उपयोग करणे आपल्या दृष्टीने उपयुक्त ठरते का ? या प्रश्नाचे उत्तर सर्व युवकांनी होकारार्थी दिले आहे.

असे वर्ग फायद्याचे ठरतील असेही मत सर्व युवकांनी व्यक्त केले आहे तसेच प्रशिक्षणाची वेळ, ठिकाण, वर्गाची मुदत प्रवेशाच्या अटी आहेत तशाच असाव्यात असे मत २५ विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे तर १६ विद्यार्थ्यांनी वेळेत बदल करून शक्यतो दुपारी ३ ते ५ अशी वेळ घ्यावी आणि विद्यार्थ्यांसाठी सोयीचे ठिकाणही निवडावे असे मत व्यक्त केले.

या वर्गात काय शिकलात यासंबंधी दिलेल्या उत्तरामध्ये सहकार क्षेत्रात काम कसे करावे, व्यवहारी जगात सहकाराचा वापर कसा करावा, ग्रामीण विकास व सहकारी बँका यासंबंधी माहिती मिळाली असे मत ३६ युवकांनी व्यक्त केले तर ५ युवकांनी सहकारी संस्था विषयी पुरेशी माहिती मिळाली नाही असे मत व्यक्त केले.

वरील माहिती वरून असे दिसते की, युवकांसाठी असे वर्ग घेणे गरजेचे आहे. पुस्तकी शिक्षणा बरोबरच सहकाराचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे यासाठी ग्राहक सहकारी भांडारे विद्यार्थ्यांनी चालवावीत त्यातून रोजगार उपलब्ध होईल व आर्थिक मदतही होईल. सहकारी बँका, सहकारी खरेदी विक्री इ. मधून रोजगार मिळेल.

महाविद्यालयीन युवकांच्या जीवनात पदवी परीक्षेनंतर नोकरी न मिळाल्यास नैराश्याची भावना येते. अशा तरूण रक्ताला योग्य वाव न मिळाल्यास ते हिंसक बनतात. हिंसाचाराला आळा घालण्यासाठी तरूणांचा विचारप्रवाह योग्य दिशेने वळवण्यासाठी त्यांना कामात गुंतवून ठेवण्यासाठी सहकारी शिक्षणाचा चांगला उपयोग होईल.

सहकारी शिक्षणामुळे युवकांच्या युवाशक्तीचा विधायक कार्या- साठी उपयोग होऊ शकतो असे जाणवते.

असे वर्ग अधिक उपयोगी व्हावेत यासाठी युवकांनी केलेल्या सूचनाही विचारात घेण्यासारख्या आहेत.

६.२.३ <u>सेवा सहकारी संस्था कार्यकर्ता शिबिर</u> -

इस्लामपूर येथे दिनांक २५ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर, १९९१ अखेर बोर्डाने घेतलेल्या सेवा सहकारी संस्थेचे कार्यकर्ता शिबिर किती उपयुक्त होते शिवाय त्याची उपयुक्तता वाढावी यासाठी शिबिरार्थींनी केलेल्या सूचनांचा येथे उल्लेख केला आहे. या वर्गात ६५ शिबिरार्थी होते.

हा वर्गाच्या तात्त्विक व व्यावहारिक उपयुक्ततेसंबंधी सर्व शिबिरार्थींनी होकारार्थी उत्तर दिले.

उपयुक्ततेची कारणे विचारली असता, संस्थेच्या कामकाजासंबंधी व्यवहार उपयोगी माहिती मिळाली असे मत २९ शिबिरार्थींनी व्यक्त केले. भू-तारण कर्ज , फळबागा, कर्ज योजना यासंबंधी माहिती मिळाली असे मत २६ शिबिरार्थींनी व्यक्त केले. चेअरमन, सेक्रेटरी यांच्या कर्तव्याची जाणीव झाली. वनशेती तसेच सहकारी संस्था अर्थक्षम होण्यासाठी काय करावे याबद्दलचे मार्गदर्शन उर्वरित शिबिरार्थींना मिळाले.

वर्गातील अभ्यासक्रम व्यावहारिक गरज भागवण्यास पुरेसा आहे असे मत ४७ विद्यार्थ्यांनी व्यक्त केले तर हा वर्ग अपुरा आहे असे मत १८ शिबिरार्थींनी दिले.

अपुरा का आहे याबद्दल कारणे सांगताना ऊस संशोधन, क्षार जमीन लागवडीखाली कशी आणावी, बायोगॅस, खतांचा वापर, सहकारी संस्थेचे दैनंदिन कामकाज, कर्ज वसुली बद्दल मार्गदर्शन, पीक कर्ज, कुटुंब कल्याण,

...SAHEB KHARDEKAR LIBRARY ...UNIVERSITY, KOLHAPUR.

वनीकरण, दुग्धव्यवसाय, यासंबंधी आणखी माहिती मिळायला हवी असे मत शिबिरार्थींनी व्यक्त केले.

वर्गाची वेळ व कामाचे तास सोयीचे आहेत असे मत ५५ शिबिरार्थींनी व्यक्त केले तर १० व्यक्तींनी वर्गाची वेळ दुपारी १२ ते ५ असावी आणि शिबीर ५ दिवसांचे असावे, तसेच चर्चेला वेळ अपुरा पडतो तो वाढवून मिळावा अशी सूचना केली.

छोटया उद्योगाबाबत आणखी माहिती मिळावी, निमंत्रित पाहुणेच यावेत, सहकार तत्त्वाचे सर्वांनीच पालन करावे, वर्ग आठ दिवसांचा असावा, जिराईत व बागाईत पीकांच्या कर्ज धोरणाबद्दल माहिती मिळावी, सहकारी संस्थामध्ये सरकारी हस्तक्षेप नसावा असे मत ५० टक्के शिबिरार्थींनी व्यक्त केले. बचती, सहकारी कायदे, कुटुंब कल्याण याविषयी आणखी मार्गदर्शन व्हावे, कर्जाच्या वाटपासंबंधी व वसुलीसंबंधी मार्गदर्शन व्हावे असे मत १० शिबिरार्थींनी व्यक्त केले.

गट चर्चा, वादविवाद यासारख्या नवीन शिक्षण पद्धतीचा उपयोग वर्गामध्ये करावा असे सर्वच विद्यार्थ्यांना वाटते.

असे वर्ग वेळोवेळी घ्यावेत. तसेच मुदत व प्रवेशाच्या अटी आहेत. त्याच योग्य आहेत असे मत ४५ शिबिरार्थींनी व्यक्त केले तर २० व्यक्तींनी प्रवास भत्ता व योग्य ते मानधन मिळावे असेही सांगितले.

अशा वर्गातून आपण काय शिकलात ? याचे उत्तर आपली सहकारी संस्था प्रगतीपथावर कशी न्यावी याचे मार्गदर्शन मिळाले. व्याख्याने व्यवहारोपयोगी वाटली. सहकार कायदे व पोटनियम यासंबंधी माहिती मिळाली असे सांगितले गेले. अशा वर्गापासून उपयुक्त माहिती मिळाली असे मत ५१ शिबिरार्थींनी व्यक्त केले. १४ व्यक्तींनी कोणतेच मत नोंदवले नाही. (सारणी क्र. ६.१ पहा)

वरील माहितीवरून हा वर्ग कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त ठरला असे दिसून येते. सहकारी संस्था यशस्वीपणे चालविण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तींची जरूरी आहे.असे प्रशिक्षण या शिबिराच्या माध्यमातून मिळते असे दिसून येते.

शिबिरार्थींनी वेळ, मुदत व विषय याबद्दल केलेल्या सूचना अंमलात आणल्यास ग्रामीण भागात सेवा सहकारी संस्था अर्थक्षम कशा व्हाव्यात याबद्दल कार्यकर्त्यांनी आणखीन मार्गदर्शन मिळावे.

६.२.४ दूध सहकारी कार्यकर्ता शिबिर -

दिनांक २७ डिसेंबर ते २९ डिसेंबर, १९९० अखेर कवठे महांकाळ येथे बोर्डाने घेतलेल्या दूध उत्पादक सहकारी कार्यकर्ता शिबीर आयोजित केले होते. या शिबिरात २८ शिबिरार्थी उपस्थित होते.

हा वर्ग व्यावहारिक दृष्टीने सर्वांनाच फायद्याचा आहे असे मत व्यक्त केले आहे. उपयुक्ततेची पुढीलप्रमाणे कारणे सांगितली आहेत :

१) चेअरमन, सचिव यांची जबाबदारी कळावी असे मत १० शिबिरार्थींनी व्यक्त केले.
२) संस्था चालविताना येणाऱ्या अडचणींबद्दल माहिती मिळाली असे मत १२ जणांचे पडले.
३) संस्थेबद्दल नियम, उपनियम सहकारी कायदे यासंबंधी ज्ञान झाले असे मत ६ व्यक्तींनी व्यक्त केले.
४) वर्गातील अभ्यासक्रम व्यावहारिक गरज भागवायला पुरेसा आहे असे मत सर्व २८ सभासदांनी व्यक्त केले.
५) या वर्गात संस्थेचे रेकॉर्ड, ताळेबंद इ. विषयी माहिती मिळाली असे मत ९ सभासदांनी व्यक्त केले. बिगर दूध उत्पादक संस्थाबद्दल माहिती मिळाली असे २ शिबिरार्थींचे मत आहे.

अशी शिबिरे अनेकवेळा घ्यावीत असे ११ जणांचे मत होते. या शिबिरात प्रत्यक्ष दूध उत्पादकाचे मार्गदर्शन मिळावे असे उर्वरित शिबिरार्थीचे मत होते.

६) वर्गाची वेळ, कामाचे तास, सोईचे आहेत असे मत २७ जणांचे आहे फक्त एका शिबिरार्थीला वेळ ११ ते ४ असावी असे वाटते. पाहुण्यांची व्याख्याने सर्व शिबिरार्थींना उपयुक्त वाटली.

आणखी कोणत्या विषयावर पाहुणे व्याख्याते आयोजित करावीत असे याचे उत्तर संस्थेचे रेकॉर्ड, ताळेबंद यासंबंधी माहिती द्यावी असे दिले गेले. तसेच पाहुण्यांनी विषय अगोदरच निवडलेला असल्यामुळे सहकारी दुग्ध व्यवसायासंबंधी इतर माहिती विचारता येत नाही असे मत ५ व्यक्तींनी दिले.

दूध चाचणी कोणत्या पध्दतीने करावी याबद्दल मार्गदर्शन हवे असे ३ व्यक्तींचे मत होते.

प्रायोगिक पध्दतीने व्याख्याने द्यावीत, तसेच अधिकारी वर्गाने व्याख्यान दिल्याप्रमाणे वागणूक द्यावी असे उर्वरित शिबिरार्थीचे मत आहे.

आणखी व्याख्याने नकोत असे मत १२ जणांच मत पडले.

वादविवाद, गट चर्चा ही पध्दत उपयुक्त वाटते असे मत सर्वच शिबिरार्थींनी व्यक्त केले आहे. तसेच हे वर्ग फायद्याचे आहेत असेही त्यांचे म्हणणे होते.

वेळ व मुदत प्रवेशाच्या अटी आहेत त्याच असाव्यात असे मत २० जणांनी व्यक्त केले आहे तर वेळ सकाळी १० ते २ असावी असे २ जणांना वाटते. वेळ ११ ते ४ असावी असे ६ जणांना वाटते.

अशा वर्गात संस्थेचे रेकॉर्ड ताळेबंद, विमा, पशुखाद्य इ. संबंधी मार्गदर्शन मिळाले असे मत १२ व्यक्तींनी दिले तसेच दुधाचे संकलन, रोग प्रतिबंधक लस, जनावरांची निगा इ. संबंधी माहिती मिळाली असे मत १० जणांचे होते. सहकारी संस्था कशी चालवावी याचे मार्गदर्शन मिळाले असे ५ सदस्य म्हणाले.

सारांश हा वर्ग दूध उत्पादक सहकारी कार्यकर्त्यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरला. पश्चिम महाराष्ट्रात दुग्ध व्यवसाय अग्रेसर आहे. दुग्ध व्यवसाय करणाऱ्या बऱ्हंशी सहकारी संस्थांना असे वर्ग फायदेशीर ठरले आहेत.

६.३ <u>उपसंहार</u> :

सांगली जिल्हा सहकारी बोर्डाने आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या सहकारी संस्थासाठी विविध प्रकारचे शैक्षणिक कार्यक्रम राबवले आहेत. (सारणी क्र. ६.१ पहा)

प्रातिनिधिक स्वरूपात महिला शिबिर, युवक शिबिर, दूध सहकारी कार्यकर्ता शिबिर, सेवा सहकारी कार्यकर्ता शिबिर या शैक्षणिक कार्यक्रमांचे मूल्यमापन केले आहे.

बोर्डाला मिळणारे आर्थिक अनुदान पहाता बोर्डाच्या शैक्षणिक कार्यक्रमांची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे शिबिरांची मुदत, वेळ, संख्या यामध्ये वाढ करण्याची गरज असूनही त्यांना हवे तसे बदल करता येत नाहीत.

तसेच सहकारी शिक्षणाची गरज सहकारी संस्था चालवणाऱ्या सर्वच सभासदांना, लाभार्थींना, उच्च स्तरावरील अधिकाऱ्यांना, मध्यम स्तरावरील अधिकाऱ्यांना आहे.

लाभार्थींना सहकारी शिक्षण देण्याची सोय करूनसुध्दा अज्ञानामुळे ते वर्गास हजर राहू शकत नाहीत. त्यामुळे सहकारी शिक्षण घेण्याची इच्छा निर्माण करणे हे काम सहकारी शिक्षणाचे कार्यक्रम राबवण्याच्या आधी व्हायला हवे.

व्यक्तीच्या मनातील सद्भावनांचे प्रतीक म्हणजे सहकार, सद्भावनां जागृत करण्यासाठी सहकारी शिक्षणाची गरज आहे. बोर्डाच्या गेल्या ४० वर्षांच्या प्रयत्नांकडे पहाता, त्यांनी गरजेनुसार आपल्या शैक्षणिक कार्यक्रमांच्या रचनेत बदल केला आहे.

ग्रामीण भागात सहकारी संस्थांच्या सचिवाकडे मोठी जबाबदारी असते. ती समर्थपणे पेलण्यासाठी किमान सहकारी शिक्षणाची अट घालावी, म्हणजे ते स्वत: अभ्यासू वृत्तीने संस्थेतील उणीवा शोधून तिची प्रगती करू शकतील.

६.४ <u>निष्कर्ष</u> :

सांगली जिल्हा सहकार बोर्डाने राबविलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांचा तपशील पहाता खालील काही गोष्टी मांडता येतील :

१) बोर्डाने गरजेप्रमाणे शैक्षणिक कार्यक्रमांची गरजेप्रमाणे व्याप्ती वाढविली आहे.
२) ग्रामीण जनतेत सहकारी शिक्षणाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नात ते बर्‍हंशी यशस्वी झाले आहेत.
३) मात्र शिबिरांची संख्या व शिबिराचा कालावधी वाढवावयास हवा.
४) व्याख्यात्याने ठरवलेल्या विषयाव्यतिरिक्त चर्चेतून येणाऱ्या विषयावर माहिती देण्याची तयारी ठेवावी.
५) विद्या वेतनात वाढ व्हावी. म्हणजे लाभार्थींना आर्थिक मदत होईल, संख्या वाढेल.

६) ग्रामीण स्तरावरील सहकारी संस्थेतील सचिवांना किमान सहकारी शिक्षणाची अट घालावी.

७) सहकारी शिक्षणाचा प्रसार अपेक्षेप्रमाणे होत नसला तरी बोर्डाने सर्वकष प्रयत्न केलेला दिसून येतो.

८) शिक्षण फंडाची रक्कम राज्य सहकारी संघाने वसूल केल्यास बोर्डाच्या अधिकारी वर्गाला आणखी विस्तृतपणे शैक्षणिक कार्यक्रम राबविता येतील.

९) राज्य सहकारी संघाने आखून दिलेल्या शैक्षणिक कार्यक्रमा-व्यतिरिक्त इतर शैक्षणिक कार्यक्रम राबविण्याचे झाल्यास त्यांना अनुदान मिळावे.

१०) सहकारी संस्थेविषयी असणारे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न शिक्षणाच्या माध्यमातून व्हावा.

११) महिला सहकारी संस्थांना उत्तेजन दिले पाहिजे.

—x—x—x—x—x—

## सारणी क्र. ६.१

### शैक्षणिक कार्यक्रमाचे मूल्यमापन

| अनु. | कारणे | महिला शिबिर २६ ते २८ डिसेंबर, ९१ सहभाग-३८ | | युवक शिबिर २९ ते ३१ ऑगस्ट, ९१ सहभाग-४१ | | दुध सहकारी कार्यकर्ता शिबिर ता.२७ ते २९ डिसेंबर, ९० सहभाग-२८ | | सेवा सहकारी कार्यकर्ता शिबिर २५ ते २७ जुलै, ९१ सहभाग-६५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | होय | नाही | होय | नाही | होय | नाही |
| १) | हा वर्ग आपणास तात्विक व व्यावहारिक ज्ञानाचेदृष्टीने उपयुक्त व फायद्याचा वाटला का ? | २८ | १० | ४१ | - | २८ | - | ६५ | - |
| २) | उपयुक्त वाटला असल्यास त्याबद्दलची प्रमुख कारणे | २८ | १० | ४१ | - | २८ | - | ६५ | - |
| ३) | झालेल्या वर्गातील अभ्यासक्रम आपली व्यावहारिक गरज भागवण्यास पुरेसा आहे का ? | १९ | १९ | ४१ | - | १३ | १५ | ४७ | १८ |
| ४) | अपुरा असल्यास आणखी कोणते विषय घेणे आवश्यक आहे ? | उ.ना. | १९ | १४ | २७ | १५ | उ.ना. | ३९ | २६ |
| ५) | वर्गाची वेळ आपणास सोयीची वाटते का ? | २७ | ११ | २६ | १५ | २७ | १ | ६५ | - |
| ६) | व्याख्याने उपयुक्त आहेत आणखी नको | २९ | ९ | ४१ | - | २८ | - | ६४ | १ |
| ७) | आणखी कोणती व्याख्याने आयोजित करणे आवश्यक आहे ? | २५ | १३ | २८ | - | १५ | १३ | ४१ | २४ |
| ८) | गटचर्चा, वादविवाद यासारख्या नवीन पध्दतींचा वर्गामध्ये उपयोग करणे आपल्या दृष्टीने उपयुक्त आहे का ? | ३६ | २ | ४१ | - | २८ | - | ६५ | - |
| ९) | असे वर्ग वेळोवेळी घेतल्यास ते फायद्याचे ठरतील असे आपणास वाटते का ? | ३८ | - | ४१ | - | २८ | - | ६५ | - |
| १०) | अशा वर्गाची वेळ, मुदत, प्रवेशाच्या अटी व ठिकाण कोणत्या असाव्यात असे आपणास वाटते ? | ३३ | ५ | २५ | १६ | २८ | - | ६५ | - |
| ११) | वर्गातून आपण काय शिकला ? | ३८ | - | ३६ | ५ | २८ | - | ५२ | उ.ना. |